# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६**

## वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ११**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एस-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**रूपये:- ८१,८४,४२,०३,०००/-**<br>**श्री. अमिन पटेल** |
| (१) | ११९९ | १० | मुंबईमध्ये नामांकित रूग्णालयामधील एक रुग्णालय सर जे.जे. ग्रुप रुग्णालय असणे, या रुग्णालयात अनेक सोयी सुविधांचा अभाव असणे, या रुग्णालयात औषधांचा तुटवडा असणे, सिटी स्कॅन मशीन एम.आर.आय मशीन बंद असणे, रुग्णांना औषधे बाहेरून घेण्यासाठी भर दिला जाणे, बहुतांश वैद्यकीय चाचण्या बाहेरून करून घेतल्या जाणे, ऑपरेशन थियेटर मागील काही काळापासून बंद असल्याची धक्कादायक बाब समोर येणे, रुग्णालयात सी टी स्कॅन करण्यासाठी दीर्घ मुदतीच्या तारखा देण्यात येणे , त्यामुळे रुग्णांचे वेळेत उपचार न होणे, महापलिकेच्या नायर रुग्णालयात देखील रुग्णांचे हाल होत असणे, त्याचप्रमाणे कामा रुग्णालय, सेंट जॉर्ज रुग्णालय, जी. टी. रुग्णालय येथे देखील औषधांचा तुटवडा निदर्शनास येणे, त्यामुळे रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक त्रस्त असणे, परिणामी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (२) | ११२५ | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयातील ग्रामीण आरोग्य सुविधा बळकटीकरण- प्रत्येक गावापर्यंत मोबाइल मेडिकल युनिट (चलत दवाखाना) सुरू नसणे, सर्व उपकेंद्रांना २४x७ नर्स व ANM (Auxiliary Nurse Midwife) उपलब्ध नसणे,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ११२७ | १० | साकोली, लाखनी, लाखांदूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रात डॉक्टर व परिचारिका यांच्या मोठ्या प्रमाणात रिक्त असणे, ग्रामीण भागात डॉक्टरांना विशेष प्रोत्साहन भत्ता लागू नसणे.याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४) | ११२९ | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयातील अत्याधुनिक आरोग्य सुविधा- तालुका स्तरावर CT-Scan, MRI मशीन, ICU बेड्स व रुग्णवाहिका सेवा कमी प्रमाणात असणे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ११३० | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयातील महिला व बालआरोग्य योजना- प्रत्येक तालुक्यात स्त्रीरोग तज्ज्ञ (Gynecologist) व बालरोग तज्ज्ञ (Pediatrician) नसणे, शासकीय रुग्णालयांमध्ये प्रसूती विभागासाठी अत्याधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध नसणे.याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ११३२ | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयातील मानसिक आरोग्य व व्यसनमुक्ती- जिल्हास्तरावर मानसिक आरोग्य सल्ला केंद्रे सुरू नसणे, व्यसनाधीनतेवर नियंत्रणासाठी विशेष De-addiction Centre नसणे.याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ११३४ | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयातील ग्रामीण भागात डेंग्यू, मलेरिया, क्षयरोग, स्क्रब टायफस आदींचे वेळेवर निदान व उपचारासाठी मोहिम होत नसणे, शाळा/महाविद्यालयांमध्ये आरोग्य जागरूकता व तपासणी शिबिरे नियमित आयोजित होत नसणे.याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ११३५ | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयातील रक्त व अवयवदान प्रोत्साहन तालुका स्तरावर ब्लड कॉम्पोनंट सेपरेशन युनिट सुरू नसणे, अवयवदानाबद्दल जनजागृती करण्यासाठी खास अवयवदान सप्ताह आयोजित होत नसणे.याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ११३६ | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयातील आपत्कालीन सुविधा - महामार्ग व ग्रामीण रस्त्यांवर ट्रॉमा केअर सेंटर नसणे, प्रत्येक तालुक्यात १०८ आपत्कालीन सेवा वाहनांची संख्या कमी असणे. शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (१०) | १२३२ | १०० | महाराष्ट्रात सर्व भागात बाजारांमध्ये दुकानदारांकडे लहान मुलांची दर्जाहीन चॉकलेट विकायला येत आहे. त्याचा मोठा परिणाम लहान मुलांच्या आरोग्यावर होत आहे. हे चॉकलेट कुठल्या कंपनीची आहे त्याचा दर्जा काय आहे. याची तपासणी केल्या जात नाही. असे सर्रास दर्जाहीन चॉकलेट गोळ्या, बिस्कीट, कुरकुरे बाजारात येत आहे. याकडे अन्न औषधी प्रशासनाचे लक्ष देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (११) | १२४५ | १०० | ग्रामीण रुग्णालय, अंजनगाव सुर्जी या रुग्णालयात वारंवार औषधांचा तुटवडा उद्भवत असून याबाबत या रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षकांनी जिल्हा औषधी भंडार, अमरावती यांच्याकडे वारंवार मागणी करूनही पुरेशा औषधांचा पुरवठा का केलेला नाही. त्याचबरोबर या रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षकांनी माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, अमरावती यांच्याकडे आवश्यक औषधांची यादी देत मागणी केली आहे. त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. या रूग्णालयात आरोग्य विषयक दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता उपाययोजना करणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १० मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई